**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६७/२०१७-१८/ 123 | दिनांक: २४.०५.२०१८ 30-5-2018

**आदेश**

**आदेश केस क्र. ६७(२०१७-२०१८)**

| | |
|---|---|
| १) श्री सुरेश शिवराम सावंत<br>मु.पो. आंबा ता. शाहूवाडी<br>जि. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर<br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग शाहूवाडी | **विरुध्द पक्षकार** |

**कोरम:-** १.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) प्रस्तुतचे अपिल/तक्रार ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्या आदेशा वरुन व्यतीत होऊन सदर तक्रार या मंचाकडे दाखल केली आहे.

24/5

२)  थोडक्यात हकीगत अशी की, तक्रारदार श्री सुरेश शिवराम सावंत, मु.पो. आंबा ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर, यांनी दिनांक २०.०७.२००६ रोजी घरगुती कनेक्शन घेतलेले आहे. सदरचे विज जोडणी करिता ६ खांब उभे करणे आवश्यक होते. मंजूरी पत्र क्र. EE/R1/ORC(P)/SHD/SHD/659/2005-06 अन्वये सदरची विज जोडणी तक्रारदाराला मंजूर करण्यात आलेली होती मंजूर पत्रानुसार सदर विज जोडणीच्या खर्च अंदाजे रक्कम रुपये ३३,६४०/- होता व तसे तक्रारदारस कळविण्यात आलेले होते. सदरची रक्कम तक्रारदाराने खर्च करावयाची होती. तक्रारदाराने सदरची रक्कम खर्च करुन वीज वाहिनी उभी केल्यानंतर तक्रारादारास सदर घरगुती विज जोडणी देण्यात आली होती. दिनांक ०३.०३.२००६ रोजी रक्कम रु. ९,६३८/-, तर मीटर तपासणी फी रु. ८०.०० दिनांक २९.०५.२००६ रोजी तक्रारदाराने भरली असून त्याने मीटर विकत आणलेला आहे. असा एकूण रक्कम रु. ४४,३५८/- इतका खर्च तक्रारदाराने सदरच्या विज जोडणी करता केलेला आहे. सदरची वीज जोडणी NonDDF योजनेतून मंजूर करण्यात आलेली आहे. शेडयूल ऑफ चार्जेस मंजूरी केस क्र. ७०/२००५ मधील दिनांक ०८.०९.२००६ रोजीचा आदेश, त्या विरुध्द मा. अपीलेट ट्रायब्युनल फॉर इलेक्ट्रीसीटी, नवी दिल्ली , तसेच त्या निर्णया विरुध्द सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अपिल क्र. ४३०५/२००७ , मधील दिनांक १०.०९.२०१६ रोजीच्या आदेशा अन्वये तक्रारदारास खर्च केलेल्या रक्कमेचा परतावा मिळणेचा हक्क निर्माण झालेला आहे. सदरच्या खर्ची मागणी करुन सुध्दा सदरची रक्कम परत न केल्याने तक्रारदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष , कोल्हापूर, यांचेकडे,त्याने केलेल्या खर्चाची केलेल्या खर्चाची रक्कम परत मिळणेसाठी तक्रार दाखल केली, तथापी . अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक १७.०१.२०१८ आदेशाने सदरची मागणी फेटाळून लावली .सबब तक्रारदाराने प्रस्तुतचे प्रकरण या मंचाकडे दाखल केले असून एकूण रु. ४४,८५८/- वजा ५००/- = ४३,३५८/-रक्कमेची मागणी केलेली आहे.

प्रकरणाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर वि. कंपीने,उपकार्यकारी अभियंता, उपविभाग शाहूवाडी यांचे मार्फत आपले म्हणणे दाखल केले आहे. ते आम्ही शब्दशः खाली नमूद करत आहोत.

"श्री सुरेश शिवराम सावंत , रा. आंबा ग्राहक क्र. २६०१९०००२९४४, यांनी दिनांक २०.०७.२००६ रोजी घरगुती कनेक्शन घेतले आहे. मंजूरी पत्र क्र. EE/R1/ORC(P)/SHD/SHD/659/05-06 नुसार ६ खांबाची लघुदाब विज वाहिनी रक्कम रु. ३३,६४०/- नुसार ६ खांबाचे काम पुर्ण करुन दिनांक २०.०७.२००६ रोजी कनेक्शन घेतले आहे.

सदर मागणीमध्ये सुरेश शिवराम सावंत ग्राहक क्र. २६०१९०००२९०१ /पी.सी. ६ पावती क्र. ५३१७६६४ दिनांक २३.०३.२००६ रोजी भरले आहे. परंतु ग्राहकाच्या बिलावर ग्राहक क्र. २६०१९०००२९४४ आहे यामध्ये तफावत आहे .

मा. विज नियामक आयोग यांनी केस क्र. ७०/२००५ आदेश दि. ०८.०९.२००६ नुसार महावितरण कंपनीच्या शेडयूल ऑफ चार्जेससाठी मंजूरी दिलेली आहे.

या मंजूरीमध्ये मा. आयोग यांनी महावितरण कंपनीचा DLC व SCC या दोन्ही अधिकारतेबाबत मंजूरी/निर्णय देताना हे निश्चित केलेले आहे की, नव्याने अस्तित्वात आलेल्या विज कायदा कलम ४३ अन्वये infrastructure म्हणजे SLC ही उभा करण्याची जबाबदारी ही विज कंपन्यांची आहे. त्यामुळे महाविरण कंपनीचा SLC चा दावा मा. आयोगाने फेटाळला आहे. हा दावा फेटाळताना मा. आयोग यांनी SLC व SCC या बाबत विज कायद्यात असणारी संबधीत व्याख्या यांचा संदर्भ घेतला आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

शेडयूल ऑफ चार्जेस मंजूरी क्र. ७०/२००५ आदेश दिनांक ०८.०९.२००६ यातील पा क्र. १६१४० मध्ये मा.आयोग यांनी ६.४ कमिशन्स रुलींग निर्णय यामध्ये जे आदेशित केलेले आहे त्यांचा सारांश असा "

1. To develop a infrastructure is the responsibility of licensee except where consumer of dedicated distribution facility.
2. For capital investment – Budget provision is being made throught annual revenue requirement (ARR) of MSEDCL.

थोडक्यात जो ग्राहक DDF ही योजना स्वमर्जीने स्विकारणार असेल असे ग्राहक वगळता इतर सर्व नवीन विज मागणी करणा-या ग्राहकासाठी लागणारे इन्फॉस्ट्रक्चर To develop a infra structure is the responsibility of licensee हे तत्व निश्चित केलेले आहे.

मा. आयोगाच्या आदेशा विरुध्द महावितरण कंपनीने मा. Appeate Tribunal for Electricity Delhi यांच्याकडे दाखले केलेले अपिल क्र. २२/२००७ हे मा. न्यायालयाने दिनांक १४.०५.२००७ रोजी आदेश करुन महावितरण कंपनीचा SLC बाबतचा दावा अमान्य केले आहे. मा. Tribunal यांनी हा निष्कर्ष जाहिर केला आहे की, विज कायदा कलम ४३ तसेच मा. शेडयुल्ड ऑफ चार्जेस मंजूर केस क्र. ७०/२००५ दिनांक ०८.०९.२००६ मध्ये लागणा-या महावितरण कंपनीला नविन विज पुरवठा देताना ग्राहकाला लागणा-या infrastructure साठी ARR मध्ये प्रोव्हीजन केले आहे. त्यामुळे एकदा ARR मधून व एकदा त्याच कामासाठी ग्राहकाकडून अशा प्रकारे दुहेरी रक्कम वसूल करता येणार नाही. It weill amount to doubling of the recovery of the expenses from the consumers. The appeal is accordingly dismissed.

मा. Tribunal यांच्या निर्णया विरुध्द महावितरण कंपनीने डायरी क्र. २०३४०/२००७ म्हणजेच अपिल क्र. ४३०५/२००७ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयांनी ही दिनांक १०.०९.२०१६ रोजी महावितरण कंपनीचे अपिल फेटाळत प्रथम मा. आयोग यांनी पारित केलेला आदेश कायम ठेवलेला आहे.

यापूर्वी सुध्दा महावितरण कंपनीचे शेडयूल ऑफ चार्जेस विपरीत, ग्राहकाने केलेला खर्च किंवा ग्राहकास करावा लागलेला खर्च परत देण्याबाबत अनेक आदेश व परिपत्रके जाहीर केलेले आहेत. उदा. वाणिज्य परिपत्रक क्र. २२१९७ दिनांक २०.०५.२००८ किंवा महावितरण कंपनी परिपत्रक क्र. ४३ इ. हे उल्लेखनी आहे की, सदर म्हणण्यात वि.प. वितरण कंपनीने तक्रारदाराची संपूर्ण मागणी गर्भितरित्या (impliedly) मान्य केलेली आहे. "

सदर म्हणण्यात वि.प. वितरण कंपनीने तक्रारदाराच्या मागणी संदर्भात कोणतीही मागणी केलेली नाही, जसे की, तक्रार अर्ज फेटाळून लावावा किंवा अशंतः मंजूर करावा ,इत्यादी.

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी आज घेण्यात आली.सुनावणी दरम्यान ग्राहकांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे तर वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता उपविभाग शाहूवाडी, श्री अभय शामराज हे उपस्थित होते, त्यांनी आपआपली बाजू विशद केली.

आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक १७.०१.२०१८ रोजी दिलेला निकाल योग्य व कायदेशीर आहे का? | नाही |
| ३) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे रक्कम परत मिळण्यास पात्र आहे काय? | होय |
| ४) अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१**

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशाची प्रत या कामी तक्रारदारांनी सादर केलेली आहे. त्या आदेशाचे अवलोकन केले असता ते एखाद्या अर्धन्याईक प्रकरणाचा आदेश कसा असू नये. हयाचा उत्कृष्ट नमूना आहे. अंतर्गत कक्षाने आपल्या आदेशामध्ये तक्रारदार आणि वि.प.कंपनीतर्फे मांडण्यात आलेले म्हणणे एवढेच, फक्त मांडून तक्रारदाराचा अर्ज फेटाळून लावत असल्याचा आदेश पारित केला आहे. तक्रारदाराचा अर्ज कोणत्या कारणास्तव फेटाळण्यात आला आहे, त्याची काही एक कारणे नमूद न करता, शेडयूल ऑफ चार्जेस मंजूरी केस क्र. ७०/२००५ आदेश दिनांक ०८.०९.२००६ व त्या विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालया पर्यन्त दाखल झालेल्या प्रकरणातील आदेश, कक्षा समोर मांडून देखिल त्यातील कायद्याच्या सुत्राचे विवेचन न करता किंवा ही कायद्याची मांडणी प्रस्तुत प्रकरणाला का लागू पडत नाही हयाचा कोणताही उल्लेख न करता किंवा त्या आदेशाकडे सोईस्कररित्या दुर्लक्ष करुन, कोणतेही कारण न देता सदरचा अर्ज कक्षाने फेटाळून लावलेला आहे. कोणतेही कारण न देता तक्रारदाराचा अर्ज फेटाळून लावणे हा एक प्रकारचा लहरी (Arbitrary) आदेश आहे. या दृष्टीने देखिल कक्षाने पारित केलेला आदेश हा मुलतः बेकायदेशीर आहे, असे या मंचाचे स्पष्ट मत आहे. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर आम्ही नकाराअर्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्र.२**

वि.प. वितरण कंपनीने दाखल केलेल्या लेखी कथना वरुनच हे शाबीत होते की, तक्रारदाराला देण्यात आलेली विज जोडणी Non DDF योजने अतर्गत देण्यात आलेली आहे. वि.प. वितरण कंपनी हे देखिल मान्य करित आहे की, तक्रारदाराने अर्जात नमूद केलेली रक्कम खर्च करुन वीज जोडणी घेतलेली आहे. यादृष्टीने कदाचित, विज वितरण कंपनीने आपल्या लेखी कैफियतीत तक्रारदाराच्या अर्जाबद्दल कोणतीही हरकत घेतलेली नाही किंवा मागणी केलेली केली. वि.प. कंपनीने या प्रकरणी दाखल केलेली लेखी कैफियत, आम्ही विस्तृतपणे आणि शब्दशः, वर नमूद केलेली आहे. विस्तार भयापोटी आम्ही तिचा पुर्नउच्चार या ठिकाणी टाळत आहोत. परंतु ही बाब निर्विवादपणे शाबीत झालेली आहे की, तक्रारदाराने विज जोडणी घेण्याकरता केलेल्या खर्चाचा परतावा त्यास मिळणेकरिता तो कायद्याने पात्र आहे. म्हणून आम्ही तसा निष्कर्ष काढीत आहोत व मुद्दा क्र. २ चे उत्तर आम्ही होकारार्थी दिलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

**मुद्दा क्र.३**

वरील नमूद केल्या प्रमाणे तक्रारदाराने ,हया अर्जात एकूण रक्कम रुपये ४३,८५८/- फक्तची, व्याजासहीत मागणी केलेली आहे. विज जोडणी मंजूर करतेवेळी तक्रारदारास विज जोडणीच्या खर्चाचे अंदाजपत्रक देण्यात आलेले होते. व ते अंदाजपत्रक रक्कम रु. ३३,६४०/- रुपयाचे होते. तसेच तक्रारदाराकडून रक्कम रु. ९६१८/- जमा करुन घेण्यात आलेली आहे. त्याची पावती देखिल या कामी दाखल केलेली आहे. तसेच तक्रारदाराने मीटर टेस्टींग फी ८०/- जमा केलेल्या असलेची पावती देखिल या कामी दाखल केलेली आहे. वर नमूद केलेल्या वरीष्ठ न्यायालयांच्या सर्व निकालां वरुन तक्रारदारास या सर्व रक्कमेचा परतावा मिळण्यास तो कायदेशीररित्या पात्र आहे. सबब प्रस्तुतची तक्रार मान्य करण्यास पात्र आहे.

सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

**आदेश**

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) जाबदार विद्युत वितरण कंपनीने तक्रारदारांस रक्कम रु. ४३,३३८/- फक्त , एक रकमी हया आदेशाचे तारखे पासून १ महिन्याचे आत द्यावी.
३) सदर रक्कमेवर ,जाबदार वीज वितरण कंपनीने, प्रचलित बॅक दराने म्हणजे द.सा.द.शे. ७% दराने व्याज विज जोडणी दिलेल्या तारखेपासून या आदेशा तारखेपर्यन्त द्यावे.
४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

24/5/2018 — 24/5 — 24/5/2018

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण